# चतुर किती बायका

# पडद्याच्या गजाआड

# खानदानी पिंजऱ्यांतून बाहेर पडून शेतांत कसें जावें?

# हा गोषा ? छे ! कैदखानाच समजावा हा जीव घेणारा !

**लेखिका : सौ. मीरा दिनकर**

माझी नणंद एका गांवांत दिली आहे. परवा त्या गांवी मी गेले होते. चारपांचशे घरांचे गांव. गांवांत सगळ्या जमातींचे लोक. विशेषतः पाटीलमंडळी जास्त. दिवस बुडत असतांना मी तेथें पोहंचले. रस्त्यापासून गांव किंचित आंत. सायंकाळची वेळ. उघड्या माळावरून वाहणारा वारा. पश्चिम क्षितिजावर रेंगाळणारा सूर्य. आभाळांतून घरट्याकडे धावणारे पक्षी. गांवाकडे परतत असलेले गाईगुरांचे थवे. शेतांत काम करणारे स्त्री-पुरुष. वातावरण अगदी प्रसन्न मोकळे मोकळे. माझे शरीर पराहून हलके झाले.

## घराबाहेर जायचं कसं ?

मी गांवांत जाऊं लागले, तोंच दोन बायका शेतांतून पायवाटेनें येत होत्या. त्यांनीं आपले सगळे अंग मळकट पांढऱ्या वस्त्रांत झाकून घेतले होते. डोक्यावर मोळी (जळण) होती. काखेंत लहान मूल. एकीची शेळी व एकीची म्हैस. त्यांनीं माझे लक्ष वेधून घेतलें होतें. आणखी खालच्या वाटेनें एक अशीच स्त्री आली. स्वतःला सगळे झाकून. काखेला जळणाचा बिंडा मारून. मला हे सारे विचित्र वाटले. गांवच्या पाटील मंडळीच्या या बायका. ही मंडळी गांवची वतनदार. घराण्यांत गोषा पद्धति. घरच्या स्त्रियांनीं घर सोडून कुठें जायचें नाहीं जायचे झाले तर 'परकाळा' (अंगाभोवती गुंडाळण्याचे शुभ्र वस्त्र) पांघरुण जायचे. स्वतःचे तोंडहि दिसूं द्यायचे नाहीं. कुण्या परक्या माणसाशी बोलायचे नाहीं. घरची प्रौढ पुरुष माणसेंहि स्वयपाक घरांत यायची नाहींत पुरुषांनीं कांहीं बोलायचे असल्यास घरच्या वयस्क स्त्रीमार्फत बोलायचे. माहेरहून भाऊ वगैरे जरी आला तरी त्याच्याशी बोलायची चोरी. अशी गोषापद्धति या गांवच्या पाटील मंडळीत. पण गेल्या दहा वर्षांत दिवस बदलले महागाई खूप वाढली. घरांत खाणारी संख्या वाढली. शेतामळ्यांत मजुरी लावण्यास परवडेना. तेव्हां घरच्या पुरुषांनीं एक मार्ग काढला. आपल्या बायकांनीं आपल्याच शेतामळ्यांत जाऊन काम करण्यास काय हरकत आहे? पण बायका कधीं घराबाहेर पडल्या नाहींत. आतां बाहेर काढायच्या कशा? ज्यांना अजिबात निर्वाह नाहीं अशांच्या बायका घराबाहेर पडल्या. पण अंगाभोंवती परकाळा पांघरून. गांवच्या माणसाला नख दिसूं न देतां. लग्नांत सवाष्णी जेवणास जाव्यात तशा. त्यांचें अनुकरण गांवच्या अनेक स्त्रियांनीं केले. त्या आतां शेतास जातांना परकाळा पांघरून जातात व पांघरून घरीं येतात. सधन घरच्या बायका कधीं घराबाहेर पडत नाहींत. त्यांना वाटते, आपल्या घराण्यांत पूर्वापार चालत आलेली रूढी कशी मोडावी? मोडलीच तर घराण्यास कमीपणा येईल. आणि विचार करण्याची वस्तुस्थिती अशी की, या रूढीविषयीं लोकांना अभिमान व मोठेपणा वाटतो. आमच्यांत गोषा आहे असें ते स्वाभिमानानें सांगतात. ते मुलांच्या लग्नांत हुंड्याची मागणी जास्त करतात. खेड्यांत गोषा पाळणें हे कुलीनतेचें, खानदाणीचें एक लक्षण मानले जाते.

आज या गांवच्या स्त्रिया प्रातःविधीसाठीं बाहेर पडतांनादेखील परकाळा पांघरून बाहेर पडतात. पुरुष मात्र गांवचे पुढारी म्हणून मिरवतात. हें पाहून माझ्या मनाला अवघडल्यागत झाले. स्वतः पुरुष हवा तसा स्वच्छंदीपणा भोगतात अन् स्त्रियांना मात्र माजघरच्या कोठडींत ठेवतात. स्वतःच्या भोगासाठीं असलेली वस्तु यापेक्षां त्यांना जादा किंमत देण्यास हे तयार नाहींत. घरीं बसून बसून रोगाचे भक्ष्य मात्र या स्त्रिया होतात.

### रोगाला आमंत्रण

याउलट कांहीं गांवांतून स्त्रियांनीं परकाळा (बुरखा) घेतल्याचे आढळत नाहीं. परंतु गोषा हा आहे. घरांतून कुठें बाहेर पडायचे नाहीं. फक्त स्वयंपाकघर संभाळायचे. माझ्या परिचयांतली एक स्त्री जेव्हां नांदायला आली तेव्हां बुरखा घेऊन आली. ती माहेरी जाते तेव्हां बुरखा घेऊनच जाते. गांवांतील कुणी तिला ओळखत नाहीं. आणि तिची कुणाशी ओळख नाहीं घर तेंच तिचें मर्यादित जग. घरांत बसून बसून ढासळलेलें शरीर. लिबलिबीत झालेली पांढुरकी त्वचा. कधीं कोणत्याहि रोगाला सहज भक्ष्यस्थानी पडणार. तो जीव माझ्या काळजांत रुतून बसला. एक दिवस मी बोललेसुद्धां "कसला गोषा घेऊन बसलीयेस. कमींत कमी आपल्या शेतमळ्याकडे तरी फिरून येत चल." यावर ती हंसली. ते हास्यहि मला केविलवाणे वाटलें. तिला सांगायचे होते, 'असं कुठं झालंय का? आम्ही या पिंजऱ्यांतून शेतामळ्याकडे जायाचे?'

### सुखाची दावणी

घरांत अशा बसून राहणाऱ्या स्त्रिया एक तर लठ्ठ होतात किंवा कृश तरी. त्यांना मधुमेह, रक्तदाब, पंडुरोग किंवा क्षयासारखे विकार उद्भवतात व आपणास कोणता विकार आहे, हे त्यांच्या लक्षांत पण येत नाहीं. कसलीहि शारीरिक तक्रार असली तरी त्याकडे दुर्लक्ष करून ती अंगावरच मारून न्यायची. जेव्हां जास्त होते तेव्हां अंथरूण धरायचे. अशीच एक गोषांतील तरुणी नांदायला आल्यानंतर तिची तब्येत ढासळत गेली. खेड्यांत कुठला वेळेवर औषधोपचार? आपण आजारी असल्याचें तिनें घरांत कुणास सांगितलेंहि नाहीं. घरचे काम करीत राहिली. जेव्हां खोकल्यानें जोर केला, हातचे काम होईना, तेव्हां भुईला अंग टाकले. मग औषधपाणी. देवदेवर्षी सुरू झाले. पण डॉक्टर नि नंतर देवालाहि तिची दया आली नाहीं. वयाच्या सव्वीसाव्या वर्षी दोन मुलें मागें ठेवून निघून गेली. मोठे घर पाहून बापानें दिली होती. घरांत गोषा. "माझ्या मुलीनें कुठें घराच्याबाहेर पडायचे नाहीं, बसून खायाचे." असले सुख पायाशी. म्हणून तीन हजार रुपये करून बापानें मुलगी दिली होती सुखाच्या दावणीला.

### कोसळणाऱ्या अनुसयाबाई

ज्यांची परिस्थिति अद्याप चांगली आहे, घरचे पुरुष कर्ते आहेत, त्या स्त्रियांनीं बसून खाल्ले तर चालते. स्वयंपाकाखेरीज त्यांच्यामागें दुसरी कसलीच विवंचना नसते. परंतु ज्या घरांत लहान मुलें त्या घरच्या स्त्रियांनीं काय करायचे? घरच्या रूढीनुसार त्यांना लोकांकडे रोजंदारीनें जाता येत नाहीं. तसे केले तर कुळाचार सोडल्यासारखे होते. समाज नांवें ठेवतो. ही मोठी भीति पोटांत असते. कुणाकडून तरी शेतमळा करून घ्यायचा. वांटेकरी जे देईल ते खात बसायचे. ते पुरेसें असलें तर उत्तम. नसल्यास आहे त्यावर निर्वाह करायचा. या परिस्थितींत सांपडलेल्या अनुसूयाबाई. पतीचे अकाली निधन झाले. तीन लहान मुलें. गांवांतले कुणी पाणवठ्यावर जाण्यापूर्वी पाणी आणतात. त्यावेळीं तांबडेहि फुटलेलें नसते. आपण पाणी आणल्याचें कुणास दिसूं नये. अंगावर फाटकी वस्त्रे. मुलांची तीच अवकळा. बाकी शेतामळ्यावरचा वांटेकरी आणून देतो. तो प्रामाणिकपणें जे देईल, तेवढेंच उत्पन्न. ते घर जणूं कैदखानाच. त्या तळमळून म्हणाल्या. "कसला हा गोषा? जीव घेणारा!" तुरुंगासारखं घरांत डांबून टाकणारा. साध्या कुणब्याच्या घरांत जन्माला आले असते तर कुठेंही अंग मोडून काम केलें असतें. दोन घास सुखासमाधानानें खाल्ले असते. बोलतां बोलतां त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या घराण्याचा गोषा सांभाळता सांभाळता स्वतः कोसळत असलेल्या अनुसूयाबाई. त्यांचा जीव लहान मुलांत अडकलेला. त्यांना ग्रासूं पहाणारं दारिद्र्य पाहतांना मलाच आंतून गलबलून आलें. मी त्यांना म्हणाले, "तुम्ही आतां असें करा. कुणाचे कांहीं ऐकूं नका. आपल्या मळ्यांत जाऊन कामधंदा करा. मुलांना शाळेला पाठवून द्या. "मुलांना एक वेळ शाळेला लावून देईन. पण मी जरा घराबाहेर पडेन तर लोक म्हणतील. नवऱ्या माघारी बघा बाईनें कुळाचार सोडला! मग काय राहिलं ह्या जन्मात?" खडूत स्त्री आपल्या श्रद्धेला अशीं जखडून आहे.

### पोपटासारखी अवस्था

या प्रसंगी माझ्या पोपटाची मला आठवण झाली. मी नांदाय आले, तेव्हां आमच्या घरांत एक पोपट होता. मी त्याची देखभाल चांगल्या प्रकारे करूं लागले. एक दिवस आकाशांत उडणाऱ्या पोपटाकडे माझे लक्ष गेले. पिंजऱ्यांतल्या पोपटाकडे पाहून मला त्याची दया आलीं. मी पटकन दार उघडले अन् त्याला आकाशांत भिरकावले पण मला विलक्षण धक्का बसला तो पोपट परत

पान १० वर पहा

---

## शेती

**लेखक : जे. एच. ठोंबरे**

# वैशाखी मूग-लागवड

## थोड्या दिवसांत हे पीक घेता येते

आपण खरीप हंगामांत नेहमीं मुग हें पीक घेतो व त्यापासून आपणाला चांगलें उत्पादनहि येते. परतु हल्लीं उन्हाळ्यांतदेखील मुगाचें पीक घेता येते. भारतीय कृषी अनुसंधान संस्था, नवी दिल्ली येथें एक नवीन मुगाची जात शोधून काढण्यांत आलेली आहे. ही नवीन जात वैशाखी मुग म्हणून ओळखली जाते.

### पिकाचें महत्व

ही जात लावल्यानें वर्षांत तीन ते चार पिकें काढण्यास मदत होते. जमिनीचा पोत सुधारतो व क्रॉप रोटेशनसाठीं तिचा उपयोग होतो. ही जात अवघी ६०–७० दिवसांत तयार होते. कीड व रोग यांचा त्रास कमी असतो. त्यामुळें उत्पन्न चांगलें येते. ही जात साधारण पसरी वाढणारी असून ती साधारणतः ४५ते५० सें मी. वाढते. फुलें पिवळी असून दाण्याचा आकार अंडाकृति असतो. दाणे रंगानें फिक्कट हिरवे असतात. साधारणतः तीन आठवड्यांनीं पीक फुलावर येते. अवघ्या एक महिन्यांत शेंगा येण्यास सुरुवात होते. बहुविध पीक पद्धतींत या पिकांचा उपयोग होतो. त्याचप्रमाणें वर म्हटल्याप्रमाणें क्रॉप रोटेशन म्हणजे पिकांची फेरवांटप यादृष्टीनें हें पीक महत्त्वाचें ठरणार आहे अनुभवावरून हें पीक महाराष्ट्रात चांगलें येऊं शकते.

### पीक घेण्याची पद्धत

जमीन : मध्यम ते भारी जमिनींत हें पीक चांगलें येते. हलक्या जमिनींत सेंद्रीय खतें जास्त प्रमाणांत टाकून हें पीक घेता येईल. मात्र पाण्याच्या एक-दोन पाळ्या अधिक द्याव्या लागतील.

मशागत : हिवाळी पिकें काढल्याबरोबर जमीन लोखंडी नांगरानें नांगरावी व जमीन भुसभुशींत करून घ्यावी. एकरी ५ ते ६ गाड्या शेणखत किंवा चांगलें कुजलेले कंपोस्ट खत देऊन तें जमिनींत चांगल्या प्रकारें मिसळावें. पेरणीपूर्वी शेत चांगले ओलवून घेऊन वाफसा येताच पिकाची पेरणी करावी.

पेरणी : वाफसा होताच एकरीं ८ ते १० किलो बीं १० ते १५ सें. मी. अंतरावर पेरावें. या पिकाची पेरणी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत केव्हांहि केली तरी चालेल. या पिकाची चांगली वाढ होण्यासाठीं बियांना शुद्ध जंतुची लस (शत्र सोबियम लेगुमिनोझिया) पेरणं पूर्वी बियास चोळावी.

पाणी : उन्हाळी पीक घ्यावयाचें असल्यानें या पिकास पाण्याची फारच गरज असते. पेरणीनंतर तीन ते चार पाण्याच्या पाळ्या लागतात. पीक फुलावर आल्यानंतर व शेंगांत दाणे भरूं लागल्यानंतर पिकास पाणी देणें फारच महत्त्वाचें असतें. यावेळीं पाणी कमी पडल्यास दाणे चांगले भरत नाहींत व उत्पादनावर विपरित परिणाम होतो.

रोग : या पिकावर रोगकिडीचा हल्ला कमी होत असला तरी त्याबाबत योग्य काळजी घेणें आवश्यक असते. मावा, तुडतुडे व पान खाणाऱ्या अळ्या या पिकावर प्रामुख्यानें आढळतात. मुरी हा रोगहि आढळून येतो. या सर्वांच्या बंदोबस्तासाठीं दर एकरीं ५ किलो १० टक्के बी. एच. सी. भुकटी आणि ५ किलो गंधकाची भुकटी यांचें मिश्रण करावें व पिकावर उडवावें.

वरीलप्रमाणें योग्य लागवड केली तर ६५ ते ७० दिवसांत एकरीं ५ ते ६ क्विंटल उत्पादन सहज निघते. बहुविध पीक पद्धतींत मुगाला खास स्थान आहे.

### आच्छादनाचा उपयोग

वैशाखी मुगाला तीन ते चार पाण्याच्या पाळ्या लागतात. पण आतां पाण्याची टंचाई असल्यानें एखादी पाळी कमी करून किंवा दोनच पाळ्यांत पीक घेण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठीं आच्छादनाचें तंत्र वापरावें. हें तंत्र कांहीं नवीन नाहीं. पण फारसे शेतकरी त्याचा उपयोग करीत नाहीं. पण यंदा निसर्गाची अवकृपा असल्यानें हें तंत्र वापरणें हितावह आहे.

जमिनींतीच ओल थोपवून धरण्यासाठीं आच्छादन म्हणून ज्वारीचे सड तूर व कपाशीच्या काड्या, निरुपयोगी गवत, उसाचें पाचट, लांकडाचा भुसा, झाडाचीं पानें, शेणखत इत्यादी पदार्थांचा उपयोग करून घेतां येईल. हें पदार्थ पीक पेरल्यानंतर जमिनीवर पसरून देतां येतील. त्यामुळें बाष्पीभवन होऊन तणाची वाढ थांबते. त्याचप्रमाणें जमिनींत पाणी मुरण्याची शक्ती वाढते.

याशिवाय आच्छादनाच्या प्रकारांत कागद अगर प्लॅस्टिकचें आच्छादन वापरतात. पण ही पद्धत थोडी खर्चाची आहे. याशिवाय, कांहीं रसायनें जमिनीच्या पृष्ठभागावर फवारूनदेखील आच्छादन निर्माण करतां येते. परंतु हें जमिनीच्या सुपीकतेकरितां योग्य नसते. त्यामुळें ही पद्धत वापरत नाहींत व ती वापरणें हितावह नसते.

वरील माहितीचा उपयोग करून शेतकरीबंधूंनीं आतां उन्हाळी हंगामांत वैशाखी मुगाची लागवड करावी. तसेंच पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा जास्तीतजास्त उपयोग करावा. त्यासाठीं आच्छादनाचा अवश्य उपयोग करून आपला अनुभव अधिक बळकट करावा.

★★